BPHES

# CSRD – INSTITUTE OF SOCIAL WORK AND RESEARCH, COLLEGE AHMEDNAGAR

## पेपरचे नाव:-

## नारायणगव्हाण येथे लसीकरण मोहिमेत सहभाग आणि जनजागृतीद्वारे कुटुंब संवर्धनासाठी समाजकार्य हस्तक्षेप.

पेपर सादरकर्तीचे नाव :- कु. निता बाळासाहेब जाधव

(MSW २ रे वर्ष विद्यार्थिनी)

मार्गदर्शक शिक्षिका:- प्रा. सौ. आसावरी झपके मॅडम

# विषय:-नारायणगव्हाण येथे लसीकरण मोहिमेत सहभाग आणि जनजागृतीद्‌वारे कुटुंब संवर्धनासाठी समाजकार्य हस्तक्षेप.

## ❖ प्रस्तावना :-

कोविड १९

कोरोना या विषाणूचा धसका संपूर्ण जगाने घेतला, या विषाणूचा आरंभिक परिणाम चीनच्या मानवी जीवनावर झाला. हळुवारपणे या विषाणूचा प्रसार जवळपास संपूर्ण जगातच झाला. डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधील वुहान या शहरामध्ये हा विषाणू आढळून आला. आणि या आजाराला 'कोविड १९' असे नाव देण्यात आले.

कोविड १९ हा एक संसर्गजन्य आजार आहे जो कोरोना या विषाणूमुळे होतो.भारतामध्ये केरळ या राज्यात ३० जानेवारी २०२० रोजी १ ला रुग्ण आढळून आला. व महाराष्ट्र राज्यामध्ये पुणे या शहरामध्ये सर्वप्रथम कोरोना बाधित रुग्ण आढळून आला.या महामारीचे परिणाम वैयक्तिक व सामूहिक अशा दोन्हीही स्तरावर झाले आहेएकंदरीत, मानवी जनजीवन विस्कळीत झाले आहे. अलीकडच्या काळात कोविड १९ वर उपाय म्हणून लसीचा शोध लागला आणि जगभरातील माणसांच्या मनातली भीती मावळली.

लसीकरण –

भारतात १६ जानेवारी २०२१ पासून लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली. प्रारंभी आरोग्य कर्मचारी, फ्रंटलाइन वर्कर, पोलीस, डॉक्टर यांना लसीकरण सुरू करण्यात आले. त्यांनतर १ मार्चपासून जेष्ठ नागरीकांसह ४५ वर्षापुढील सहव्याधी असलेल्या व्यक्तींना लसीकरण करण्यास सुरुवात झाली. व त्यांनतर लसींच्या उपलब्धतेनुसार १ मे पासून १८ ते ४४ वयोगटासाठी ते खुले केले गेले.जगात आत्तापर्यंत १.१९ अब्ज तर भारतात ११.१ कोटी दोन्ही डोसचे संपूर्ण लसीकरण झाले आहे. महाराष्ट्रात १ कोटी ६५ लाख २० हजार लोकांना लसीकरनाचे दोन्ही डोस देण्यात आले आहे.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये आत्तापर्यंत १३,३५,२६३ लोकांचे लसीकरण झाले असून ९,६३,७२५ नागरिकांना लसीची १ ली मात्रा तर, ३,७१,५३८ नागरिकांना लसीची २ री मात्रा देण्यात आली आहे. अ. नगर जिल्ह्यातील नगर-पुणे महामार्गावर वसलेल्या नारायणगव्हाण गावची एकूण लोकसंख्या २५९१ इतकी असून १४५० लोक १८ वर्षापुढील आहेत, त्यापैकी ४०% लोकांचे लसीकरण झालेले आहे. तसेच, नागरिकांना विविध प्रकारचे समज-गैरसमज लसीविषयी होते आणि म्हणून समाजकार्य हस्तक्षेपाद्वारे संशोधिकेने आवश्यक असणारी मध्यस्ती केली आहे.

# ❖ सर्वेक्षणाचे उद्दिष्टे

- नारायणगव्हाण मधील कोविड १९ ची परिस्थिती समजून घेणे.
- नारायणगव्हाण येथील लसीकरणाबाबतची परिस्थिती समजून घेणे.
- नारायणगव्हाण मधील लोकांचे लसीकरणाबाबत असणारे समज-गैरसमज समजून घेणे.
- समाज कार्यकर्त्यांसाठी आवश्यक असणारी मध्यस्ती करणे.

# संशोधन पद्धती

- अध्ययनासाठी भौगोलिक क्षेत्र म्हणून २५९१ लोकसंख्या असलेल्या नारायणगव्हाण गावाची निवड केली होती. एकूण लोकसंख्येपैकी अध्यायना दरम्यान १५० निवेदकांशी प्रत्यक्ष संपर्क साधला.
- वैयक्तिक चर्चा, सामूहिक चर्चा, निरीक्षण, गृह भेट याद्वारे तथ्य संकलन केले.
- गटकार्य, समुदाय संघटन, सामाजिक कार्य, या पद्धतींचा वापर अध्ययनादरम्यान करण्यात आला.

# ❖ समाजकार्य हस्तक्षेप

कोविड १९ तिसरी लाट जनजागृती रॅली




कोविड योद्धा 'रक्तदान शिबीर' का



समुदायामध्ये ‘मास्क वितरण’ आणि जनजागृती



लसीकरण सहभाग व लसीविषयी जनजागृती



अबालवृद्ध,अशिक्षित व्यक्तींची नावनोंदणी



रॅपिड व RT-PCR चाचण्या









समुदायातील उपकेंद्रात रॅपिड चाचणीद्वारे नागरिकांच्या तपासण्या आणि नावनोंदणी

आशावर्कर समवेत कोविड १९ आणि लसीकरणाचा सर्वे

# ❖ निष्कर्ष

- ✔ समुदायामध्ये कोविड १९ लसीविषयी असणारे गैरसमज दूर झाले.
- ✔ लसीकरणासाठी समुदायातील लोक उद्‌युक्त झाले व लस घ्यायला प्रतिसाद देऊ लागले.
- ✔ समुदायातील एकूण लोकसंख्येपैकी पात्र नागरिकांमधील ४०% नागरिकांचे लसीकरण झाले.
- ✔ समुदायामध्ये कोविड १९ ला प्रतिबंध करण्याच्या जनजागृती पर उपक्रमांमधून ‘ आपले गाव आपली जबाबदारी ‘ ची जाणीव नागरिकांना झाली.
- ✔ Rat, RT-PCR चाचण्यांसाठी आवाहन केले असता समुदायातील ७५% नागरिकांनी चाचण्या केल्या.
- ✔ शंका आली तर चाचणी करून घेण्यास लोक स्वतःहुन प्रवृत्त झाले.
- ✔ सार्वजनिक ठिकाणी मास्क,सॅनिटायझर चा वापर व त्रिसूत्री चे पालन लोक करू लागले.

# धन्यवाद !